(CNR NO.MHAM070001062026)

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३९/२०२६**
**अरविंद ... वि... निरंक**
**मध्ये निशाणी ०१ लगत आदेश**

:: **आदेश** ::

१. अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी दाखल केलेला आहे. अर्जदार चे आजोबा **गणपत तुकाराम सिरसाट** हे दिनांक ०४/०८/१९९५ तसेच आजी – **अंजना गणपत सिरसाट** ही दिनांक ०२/१०/२०२० रोजी मयत झाली आहे. तसेच अर्जदाराचे वडील **अजाबराव गणपतराव सिरसाट** हे दि.०९/११/२०२२ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार व (अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्ती ) हे मयताचे नातु, सुन व नात या नात्याने कायदेशिर वारस आहेत.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनांनुसार त्यांना खाजगी व शासकीय कामासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जासोबत अर्जदारांनी नि.क्र.४ खाली मयताच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदार व (अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्ती ) यांचे आधार कार्डाची प्रत दाखल केली आहे.

३. अर्जाचे पृष्ट्यार्थ अर्जदार **अरविंद अजाबराव सिरसाट** यांनी नि.क्र.०८ वर स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने अर्जातील मजकुराचा शपथेवर पुर्नउच्चार केला आहे. याशिवाय, अर्जदारांनी मयत **गणपत तुकाराम सिरसाट** यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.०९ वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी मयत **अंजना गणपत सिरसाट** यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.१० वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी मयत **अजाबराव गणपतराव सिरसाट** यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.११ वर दाखल केलेले आहे. अर्ज

परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्तींच्या आधार कार्डच्या साक्षांकीत प्रती दाखल केलेल्या आहेत. अर्जदार याने त्याचे पुराव्यात तो व (अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्ती ) हे मयत **गणपत तुकाराम सिरसाट व अंजना गणपत सिरसाट** यांचे वारस असल्याचे कथन केले आहे. तसेच सदर वारस वगळता मयत **गणपत तुकाराम सिरसाट व अंजना गणपत सिरसाट** यांना इतर कोणीही वारस नसल्याचे अर्जदार यांनी पुराव्यात सांगीतले आहे. तसेच अर्जदाराने मयत **गणपत तुकाराम सिरसाट** यांची आई फार वर्षापुर्वी मयत झालेली आहे असे सांगीतले आहे. तसेच अर्जदार याने प्रस्तुत प्रकरणात पुरसिस दाखल करुन गणपत तुकाराम सिरसाट व अंजना गणपत सिरसाट यांना अजाबराव गणपत सिरसाट हे एकमेव अपत्य व वारस होते असे कथन केले आहे.

४. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की, नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकुराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र "**दैनिक मात्रृभुमी**" च्या दिनांक १६/०२/२०२६ च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार **अरविंद अजाबराव सिरसाट** यांची साक्ष नि.क्र.०८ वर शपथपत्राव्दारे नोंदविण्यात आली आहे. त्यांची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधित आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमुद कथनांस मिळते-जुळते आहे. त्यामुळे अर्जातील कथन, तोंडी व कागदोपत्री पुरावा, इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार व (अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्ती ) हेच मयत **गणपत तुकाराम सिरसाट व**

**अंजना गणपत सिरसाट** यांच्या पश्चात कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

५. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदाराने त्याचे आजोबा **गणपत तुकाराम सिरसाट व अंजना गणपत सिरसाट** यांचे वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केलेली आहे. हिंदु वारसा कायदा १९५६ चे कलम १५ नुसार मयत महिलेची मिळकत ही प्रथम तिचे मुलांना, मुलींना व तिचे पतीस मिळते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांचे वडील अजाबराव गणपतराव सिरसाट हे मयत असुन त्यांची पत्नी व **गणपत तुकाराम सिरसाट व अंजना गणपत सिरसाट** यांची सुन **आशा अजाब सिरसाट** ही हयात आहे. त्यामुळे हिंदु वारसा कायदा १९५६ कलम १५ चा विचार करता अंजना गणपत सिरसाट हिचे वारस पाहतांना **आशा अजाब सिरसाट** हीस वगळणे आवश्यक आहे. करिता अर्जदार यांना मयत **गणपत तुकाराम सिरसाट व अंजना गणपत सिरसाट** यांचे कायदेशिर औपचारीक वारस (formal legal heir) म्हणुन वारस प्रमाणपत्र देणे योग्य होईल. करीता खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.
२. अ) अर्जदार व अर्ज कलम ०१ मधील इतर अर्जदार (अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्ती ) हे मयत **गणपत तुकाराम सिरसाट** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र त्यांच्याकडुन योग्य तो मुद्रांक शुल्क घेवून त्यांच्या नावे देण्यात यावा.

ब) अर्जदार व अर्ज कलम ०१ मधील इतर अर्जदार परंतु अर्ज कलम १–ब मधील सुन **आशा अजाब सिरसाट** वगळुन (अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नमुद व्यक्ती परंतु अर्ज कलम १–ब मधील सुन **आशा अजाब सिरसाट** वगळुन ) हे मयत **अंजना गणपत सिरसाट** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र त्यांच्याकडुन योग्य तो मुद्रांक शुल्क घेवून त्यांच्या नावे देण्यात यावा.

SAGAR BHARAT BAHIRAT
Digitally signed by SAGAR BHARAT BAHIRAT
Date: 2026.04.08 15:37:03 +0530

अंजनगाव सुर्जी
दिनांकः ०८/०४/२०२६

**(एस.बी. बहीरट)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंजनगाव सुर्जी